कार्यालय, नागपूर कृषि उत्पन्न बाजार समिती, नागपूर

पं. जवाहरलाल नेहरू मार्केट यार्ड, नागपूर - ३५

कार्यालय : 0712-2680280, 2680877
E-mail : apmcnagpur@rediffmail.com, Website : www.apmcnagpur.com

श्री/श्रीमती ______________________________ यांस,

स.न.वि.वि.

आपणांस कळविण्यांत येते की, समितीची वार्षिक सर्वसाधारण सभा बुधवार दिनांक २४/०९/२०२५ रोजी दुपारी १.०० वाजतां आयोजीत केलेली आहे. सदर सभेसाठी आपणांस आमंत्रीत करण्यात येत आहे. तरी आपण सभेला उपस्थित राहावे, ही विनंती.

स्थळ :- संत्रा व फळे लिलाव दालन क्र.०४ पं. जवाहरलाल नेहरु मार्केट यार्ड, कळमना, नागपूर.

कृषि विपणन समृद्धि

आपला

अहमदभाई करीमभाई शेख
सभापती

कार्यालय, नागपूर कृषि उत्पन्न बाजार समिती, नागपूर

पं. जवाहरलाल नेहरू मार्केट यार्ड, नागपूर - ३५

विनम्र श्रध्दांजली

अहवाल वर्षात जे देशभक्त, स्वातंत्र्य सेनानी, थोरनेते, लेखक संशोधक, कवी, साहित्यीक, कलावंत, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, खेळाडु, सामाजिक व सहकारी कायकर्ते, संस्थेचे आजी माजी संचालक सभासद व हितचिंतक ग्राहक सेवक, कर्मचारी दिवंगत झाले त्या सर्वाच्या कुटुंबियांचे दु:खात सहभागी असुन दिवंगतांना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करित आहोत. त्यांच्या आत्म्यास चिर:शांती व सद्गती लाभो अशी ईश्वर चरणी प्रार्थना.

ओम शांती.. शांती...

कार्यालय, नागपूर कृषि उत्पन्न बाजार समिती, नागपूर

पं. जवाहरलाल नेहरू मार्केट यार्ड, नागपूर - ३५

वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

महोदय,

आपणांस कळविण्यांत येते की, नागपूर कृषि उत्पन्न बाजार समितीची वार्षिक सर्वसाधारण सभा गुरूवार दिनांक २४/०९/२०२५ ला दुपारी १.०० वाजतां पं. जवाहरलाल नेहरू मार्केट यार्ड, कळमना, नागपूर येथील संत्रा व फळे लिलाव दालन क्र.४ मध्ये आयोजीत केलेली आहे. सभेसमोरील विषयांची सूची खालील प्रमाणे दिलेली आहे. तरी आपण सभेला उपस्थित राहावे, ही विनंती.

सभेची विषय सूची

विषय क्र.१ :— सन २०२३—२४ चे वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त मंजूर करणे.

विषय क्र.२ :— संचालक मंडळाचे वतीने सादर केलेला सन २०२४—२५ चा वार्षिक अहवालाची माहिती देणे.

विषय क्र.३ :— सन २०२४—२५ च्या ताळेबंद पत्रकाची माहिती देणे.

विषय क्र.४ :— सन २०२५—२६ चे आर्थिक अंदाजपत्रक माहितीस्तव सादर.

विषय क्र.५ :— सन २०२३—२४ मा. जिल्हा विशेष लेखा परिक्षक, सहकारी संस्था, नागपूर यांनी सादर केलेला लेखापरिक्षण दाखला माहितीस्तव सादर.

नागपूर
दिनांक : २०/०९/२०२५

दिनेश चंदेल
सचिव
कृषि उत्पन्न बाजार समिती
नागपूर

टिप :— १. आमसभेस येतांना पत्राची प्रत सोबत आणावी.

२. सभासदांना काही प्रश्न विचारावयाचे असल्यांस ते प्रश्न समितीचे कार्यालयांत दि. २०/०९/२०२५ पर्यत मिळतील, अश्यारितीने पाठवावे. यानंतर मिळालेल्या प्रश्नांची उत्तरे देणे बंधनकारक राहणार नाही.

दिनेश चंदेल
सचिव
कृषि उत्पन्न बाजार समिती
नागपूर

विषय क्र.१ :— सन २०२३—२४ चे वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त मंजूर करणे.

कार्यालय,नागपूर कृषि उत्पन्न बाजार समिती, नागपूर
पं.जवाहरलाल नेहरू मार्केट यार्ड,नागपूर—३५

नागपूर कृषि उत्पन्न बाजार समितीचे वार्षिक सर्वसाधारण सभा गुरूवार दिनांक १२.०९.२०२४ रोजी दुपारी १.०० वाजतां बाजार समितीचे पं.जवाहरलाल नेहरू मार्केट यार्ड वरील संत्रा लिलाव दालन क्रमांक ४ मध्ये बाजार समितीचे सभापती मा.श्री.अहमदभाई करीमभाई शेख यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

सदर सभेला नागपूर तालुक्यातील ग्रामपंचायत सरपंच	६२
त्याचप्रमाणे नागपूर सेवा सहकारी संस्था अध्यक्ष	५३

सभेला उपस्थित होते.

अडते/व्यापारी/प्रतिनिधी	एकूण ७५
हमाल पतिनिधी	एकूण १२

सभेला उपस्थित होते.

तसेच मंचकावर समितीचे सर्व संचालक मंडळ, सचिव व इतर अधिकारी उपस्थित होते सभेचे संचालन कृषि उत्पन्न बाजार समितीचे वतीने सौ.विजयाताई वैद्य यांनी केले. त्यानंतर समितीचे सभापती मा. श्री.अहमदभाई करीमभाई शेख यांनी प्रास्ताविक भाषण केले. त्यांनी अहवालाचे वाचन केले त्यात समितीने केलेल्या कामाची व समितीचे पुढील उपक्रमाबाबत माहिती दिली. व त्यानंतर विषय पत्रिकेवरील एकेका विषयावर सविस्तर चर्चा करून खालील प्रमाणे ठराव पारित करण्यांत आले.

विषय क्र.१ :— मागील वर्ष सन २०२३—२४ चे वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त मंजूर करणे.

ठराव क्र.१ :— मागील सन २०२३—२४ चे वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्ताचे प्रती उपस्थित सदस्यांना देण्यांत आली. त्यास उपस्थित सभासदांनी मंजूरी प्रदान केली.

ठराव सर्वानुमते मंजुर

विषय क्र.२ :— संचालक मंडळाचे वतीने सादर केलेला सन २०२३—२४ चा वार्षिक अहवाला ची माहिती देणे.

ठराव क्र.२ :— मा.सभापती महोदयांनी सन २०२३—२४ चा वार्षिक अहवाल सभेपूढे वाचून दाखविला व याबाबत सभेला बाजार समितीतील पुढील उपक्रमाबाबत सविस्तर माहिती देण्यांत आली ती पुढील प्रमाणे आहे.

बाजार समितीतील पुढिल उपक्रम :—

माती परिक्षण :— बाजार समिती क्षेत्रातील २११ गावातील शेतकऱ्यांचे शेतातील मातीचे नमुने घेवुन शेतकऱ्यांच्या सभा बोलावीने व त्यांना माती परिक्षणाचे महत्व पटवून देणे. तसेच तंत्रज्ञानाप्रमाणे शेती करण्यासाठी प्रवृत्त करणे व शेतकऱ्यांना जमिनीच्या आरोग्य पत्रिका वितरीत करणे इत्यादी उपक्रम बाजार समितीचे स्वनिधीतून राबविण्यांत आले.

बांधकाम व जमिनी विषयी माहिती उपक्रम :—

बाजार समितीचे पं.जवाहरलाल नेहरू बाजार आवार मौजा चिखली देवस्थान येथील समितीकडे १४० एकर जागा असून बाजार आवार विकास विस्ताराकरिता लगतची खसरा क्र ९४ मधील ९.५६ एकर जागा संपादीत करण्यात आली असून खसरा क्र ११४/१ मधील १.७२ एकर व खसरा क्र ११४/२—३ ख मधील १.६२ हेक्टर जागा संपादनाची कार्यवाही सुरू आहे.

न्यु कॉटन मार्केट यार्ड गणेशपेठ येथे ३ एकर जागेत अद्यावत आंतरराष्ट्रीय दर्जाचे वातानुकुलीत फूल मार्केट उभारणेकरीता प्रस्तावीत आहे. नागपूर सूधार प्रन्यास व कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये वाटाघाटी सूरू आहे.

समितीचे उपबाजार बुटीबोरी येथील खसरा क्र १२८ येथे भाजी/गोडावून लिलाव दालन उभारण्याचा कामास रू. १,८६,४३,०१२/— रकमेच काम प्रस्तावीत आहे. शासनाकडून कामाची मंजूरी प्राप्त झालेली आहे लवकरच काम सुरू होईल.

समितीचे पं.जवारहरलाल नेहरू मार्केट यार्ड मध्ये सी.सी रोड,डांबरीकरण,नविन भाजी बाजार डी. आय.पाईप लाईन या सर्व कामाची मंजूरी मा.पणन संचालक, म.रा.पूणे यांचेकडून प्राप्त आहे त्या सर्व कामची किंमत रू. ७५,०३,११,९६०/— चे आहे सर्व कामाची लवकरच सुरूवात करण्यात येईल.
भाजी बाजारातील १४६ गाळयांचे बांधकाम पूर्ण झाले आहे. लवकरच गाळे वाटप होउन नविन जागेवर भाजी बाजार स्थानांतरीत करण्यात येईल.

समितीचे पं.जवाहरलाल नेहरू मार्केट यार्ड येथील आलू कांदा बाजार,संत्रा व फळे बाजार, धान्य बाजार,मिरची मार्केट व न्यू ग्रेन मार्केट पे ॲण्ड यूज शौचालयाचे काम रू. २,४७,९०,४४०/— चे आहे. लवकरच सर्व बांधकाम सुरू करण्यात येत आहे.

समितीचे पं.जवाहरलाल नेहरू मार्केट यार्ड येथिल शेतकरी भवन मधील तळ मजल्याचे नुतनीकरण रू. ८३,८२,२७४/— चे कामाचे शासकीय मंजूरी प्राप्त झालेली आहे. लवकरच काम सुरू करण्यात येत आहे.

समितीचे पं.जवाहरलाल नेहरू मार्केट यार्ड न्यू ग्रेन मार्केट,आलू कांदा बाजार,संत्रा व फळे बाजार, धान्य बाजार,मिरची बाजार व भाजी बाजार निहाय देखभाल/दुरूस्ती रू.४,७२,८३,२६७/— चे कामाची शासनाकडून मंजूरी प्राप्त झाली आहे. लवकरच काम सुरू करण्यात येईल.

समितीचे पं.जवाहरलाल नेहरू मार्केट यार्ड येथिल सिव्हर व स्ट्रॉम वाटर पाईप लाईन प्रकल्प महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे कडून प्राप्त प्रकल्प अहवाल रू.१५,१४,६७,९२७/— चे काम प्रस्तावीत आहे. अहवाल मंजूरीकरीता शासनाकडे पाठविला आहे.

समितीचे पं.जवाहरलाल नेहरू मार्केट यार्ड मध्ये शेतकरी, हमाल, अडते यांचे करीता ४ थंड पाणीचे आर.ओ प्लॉन्ट वाटर ए.टि.एम सुरू आहे आणि १ आर.ओ प्लान्ट ए.टि.एम. प्रस्तावीत आहे.

समितीचे पं.जवाहरलाल नेहरू मार्केट यार्ड मध्ये संपूर्ण मार्केट मधिल लिलाव दालनातील जुन्या ए. सी. शिट काढून नविन प्रोफाईन शिट लावण्याचे काम सुरू आहे.

विद्युत व पाणी विभाग विषयी माहिती उपक्रम :—

समितीचे पं. जवाहरलाल नेहरू मार्केट यार्ड मध्ये विद्युत व्यवस्था सुरक्षित ठेवण्याचे दृष्टीने ग्रीड केबल नेटवर्कच्या नुतणीकरणाचे काम झालेले आहे. अस्तित्वात असलेले सर्व पथदिवे/फ्लडलाईट्स उर्जा कार्यक्षम अत्याधिक स्मार्ट एल.ए.डी पथदिवे/फ्लडलाईट्सने बदलविणे इमारती व ऑक्शन हॉल मधील जुने विद्युत पॅनल काढुन नविन एम.सी.सी.बी पॅनल लावणे व संपूर्ण बाजार आवारात ९५० के.व्ही. क्षमतेचा सोलर प्रकल्प प्रस्तावित आहे.

गादा ते पं. जवाहरलाल नेहरू मार्केट यार्ड ,कळमना पर्यंत २५० एम.एम. व्यासची १५ किमी.नविन डी.आय. पाईप टाकण्यात आली आहे.

नागपूर तालुक्यातील ग्रामपंचायती, सेवा सहकारी संस्था चे पदाधिकारी व सदस्य, व्यापारी व अडते आणि हमाल वर्गाचे तसेच कृषि उत्पन्न बाजार समितीचे पदाधिकारी, सदस्य, अधिकारी व कर्मचारी यांच्या सहकार्यामुळे हे घडू शकले त्या सर्वांचे आभार मानतो.

आपण करीत असलेल्या सहकार्याबद्दल मी आपणां सर्वांचे आभार माणून हा अहवाल संपवितो

ठराव सर्वानुमते मंजुर.

विषय क्र.३ :— सन २०२३—२४ चे ताळेबंद पत्रक माहितीस्तव सादर.

ठराव क्र.३ :— सन २०२३—२४ चे आयव्यय पत्रक व ताळेबंद पत्रक सभेपुढे सादर करून वाचून दाखविले व त्यातील मुख्य शिर्षकाबाबत सभेला सविस्तर माहिती देवून सन २०२३—२४ चे आर्थिक पत्रकांना मंजुरी देणेबाबत सन्माननीय सदस्यांना विनंती केली. त्यावर संक्षीप्त चर्चा होवून सन २०२३—२४ चे आर्थिक अंदाजपत्रक/ताळेबंद पत्रकांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजुर.

विषय क्र.४ :— सन २०२४—२५ चे आर्थिक अंदाजपत्रक माहितीस्तव सादर,

ठराव क्र.४ :— मा.सभापती महोदयांनी सन २०२४—२५ चे आर्थिक अंदाजपत्रक सभेपूढे सादर करून वाचून दाखविले. यातील उत्पन्न व खर्चाच्या मुख्य शिर्षाबाबत सभेला सविस्तर माहिती देवून सन २०२४—२५ च्या अर्थसंकल्पास मंजुरी देणेबाबत सन्माननिय सदस्य/सभासदांना विनंती केली.

यावर सक्षीप्त चर्चा होवून अर्थसंकल्प यथायोग्य असल्याची खात्री झाल्याने सन्माननिय सभासद/सदस्यांनी यास एकमताने मंजुरी दिली.

ठराव सर्वानुमते मंजुर.

विषय क्र.५ :— विभागीय सहनिबंधक (लेखापरिक्षण), सहकारी संस्था, नागपूर यांनी सादर केलेला वर्ष २०२२—२३ च्या लेखा परिक्षणाचा अहवाल माहितीस्तव सादर.

ठराव क्र.५ :— मा. सभापती यांनी विषयाचे वाचन करून मा. विशेष लेखा परिक्षक वर्ग २ सहकारी संस्था (ग्राहक)नागपूर यांनी सादर केलेला सन २०२२—२३ चा कार्यालयाकडे सादर केलेला लेखा परिक्षण अहवाल सभेपूढे सादर करण्यांत आला व सदर लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेऊन त्यास मान्यता देणेबाबत सन्माननिय सदस्य/सभासदांना विनंती केली.

त्यावर संक्षीप्त चर्चा होवून सदर तपासणी अहवालात कोणतेही गंभीर आक्षेप नसल्यामुळे त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजुर.

यानंतर सभेसमोर कोणतेही विषय/आक्षेप चर्चेला न आल्यामुळे सभेची कार्यवाही शांततामय वातावरणात चालविण्यास सहकार्य केल्याबद्दल मा. सभापती यांनी सभेला उपस्थित सन्माननीय समिती सदस्य व सभासदांचे पुन:श्य आभार मानुन सभेचे कामकाज संपल्याचे जाहिर केले व यानंतर ही सभा संपली.

एन.पी. यगलेवाड	अहमदभाई करिमभाई शेख
अपर निबंधक तथा सचिव	सभापती

कृषि उत्पन्न बाजार समिती, नागपूर

विषय क्र.२: संचालक मंडळाचे वतीने सादर केलेला सन २०२४—२५ चा वार्षिक अहवालाची माहिती देणे.

वार्षिक सर्वसाधारण सभेचा अहवाल

सन्माननीय बंधु—भगिनिंनो,

नागपूर कृषि उत्पन्न बाजार समितीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या निमित्ताने आपणा सर्वांचे मी मन:पुर्वक स्वागत् करतो.

नागपूर जिल्हयातील अग्रणी असलेली बाजार समिती दिनांक १६ नोव्हेंबर १९७४ ला महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी—विक्री (नियमन) अधिनियम १९६३ नुसार स्थापन झालेली असून हया बाजार समितीने ५० व्या वर्षात पदार्पण केले आहे. शेतक—यांकरीता सर्व सोयींयुक्त एक कार्यक्षम बाजार समिती म्हणून आपली प्रतिमा निर्माण करण्यांस समितीला यश मिळालेले आहे. हया पार्श्वभूमीवर समितीचा वर्ष २०२४—२५ चा वार्षिक अहवाल सादर करतांना आनंद वाटतो.

समितीचे कार्यक्षेत्रे नागपूर (ग्रामीण) तालुक्याकरीता असून एकूण २११ गावांचा त्यात समावेश आहे. पं. जवाहरलाल नेहरू मार्केट यार्डावर धान्य, नविन धान्य, मिरची, संत्रा व फळे, कांदा—बटाटा, भाजी बाजार आणि गुरांचा व बकरा बाजार भरतो. तसेच बुटीबोरी येथे कापूस बाज़ार, हे उपबाजारे अधिसुचित आहेत.

समितीने नियमनाखाली तांदूळ, गहू, ज्वारी, तूर, मुंग, चना, उळीद, डाळीब, बाजरा, सोयाबीन, जवस, तिळ, भुईमुंग शेगां, एरंडी, अंबाडी, धान, कापूस, मिरची, चिंच, सरकी, संत्रा, आंबा, मोसंबी, केळी, सेब, द्राक्षे, व इतर फळे, कांदा—बटाटे, लसून, अद्रक, सुरण, टोमॅटो, कोकम, कंद, कोयरा, पालेभाज्या, सर्व प्रकारच्या भाजीचा प्रकार, हळद, दुधाळू जनावरे, बकरी, मेंढया, गवत, कडबी, चारा व फुले अधिसूचीत केली असून सर्व मुख्य व उपबाजारांत नियमीत सर्व शेतमाल खरेदी—विक्रीचे व्यवहार होतात.

नागपूर कृषि उत्पन्न बाजार समिती सन १९७४ मध्ये महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी—व्रिक्री अधिनियम १९६३ अन्वये प्रस्थापित झाली आहे. त्याआधी व नंतरही नागपूर शहरात धान्य उपबाजार,न्यु ग्रेन उपबाजार, संत्रा फळे उपबाजार, आलु—कांदा उपबाजार,भाजी बाजार, मिरची व गुरे उपबाजार, बकरा बाजार वेगवेगळया ठिकाणी महानगरपालिकेच्या जागेत भरत होते. नागपूर महानगर पालीकेच्या जागेवर असलेले हे बाजार अत्यंत अडचणीचे होते. त्या ठिकाणी स्थाई स्वरुपाच्या सोयी उपलब्ध करुन देणे शक्य नव्हते. रहदारीकरीता अपूरे रस्ते, शेतक—यांचा माल ठेवण्याकरीता अपूरी जागा, शेतमालाचे आवागमनांत सतत येणारे अडथळे, कोडी इत्यादी अडचणीवर मात करण्यासाठी मुख्य बाजार आवार असल्याशिवाय हया सोयी शेतक—यांना उपलब्ध करून देणे शक्य होणार नाहीं. असा विचार तत्कालीन संचालक मंडळाने केला. बाजार समिती प्रस्थापित झाल्यानंतर हे सर्व उपबाजार एकत्र एकाच उपबाजार च्या परिस्थितीचा विचार करुन, त्याचे गांभीर्य लक्षात घेवून नागपूर सुधार प्रन्यासने ठिकाणी आणावे म्हणून नागपूर सुधार प्रन्यासकडून जागेची मागणी करण्यांत आली. बाजार समितीला १२६.२५ एकर जागा चिखली (देवस्थान) हया ठिकाणी उपलब्ध करुन देण्याचे मान्य केले परंतु त्यापैकी ११०.८८ एकर जागेचा ताबा नागपूर सुधार प्रन्यासने बाजार समितीला १९८१ साली दिला.

बाजार समितीला नागपूर सुधार प्रन्यास कडून ११०.८८ एकर जमिनीचा ताबा मिळाल्यानंतर सर्व बाजाराची व्यवस्था एकत्र एकाच ठिकाणी करण्याकरीता मे. किर्लोस्कर कंसल्टंट पुणे यांना फिजीबीलीटी रिपोर्ट व झोनल प्लॅन रिपोर्ट सादर करणेकरीता आमंत्रीत केले. झोनल प्लॅन व फिजीबीलीटी रिपोर्ट प्राप्त झाल्यानंतर बाजार समितीने भारतातील सुप्रसिध्द वास्तू शिल्पकार मे. शिवदानमल मोखा यांचेकडे बांधकामाचा आराखडा तयार करण्याचे काम सोपविले. व त्यानंतर बाजार विकासाची कामे व बांधकामाकरीता दोन टप्पे निश्चीत करण्यांत आले. बाजार आवारातील बांधकामे टप्प्या—टप्प्याने पुर्ण करुन वर्ष १९८६ मध्ये मिरची गुरे बाजार व संत्रा बाजार, १९८८ मध्ये धान्य बाजार तसेच १९९२ मध्ये कांदा व बटाटा बाजार, २००६ मध्ये ईतवारी येथील धान्य बाजार व दिनांक २४.०८.२०१३ रोजी महात्मा फुले भाजी बाजार व सन २०२० पासुन बकरा मंडी बाजार आवारावर सुरू झालेला आहे.

भाजी बाजारालगतची खसरा क्र. ११४ मधील ४.५ एकर जागा समितीने संपादीत केली असून लगतची शासनाकडून मिळालेली ३ एकर जागा व समितीने संपादीत केलेली २६एकर मिळून एकूण १४४ एकर जागेचा अद्यावत सुविधायुक्त सुधारीत आराखडा नागपूर सुधार प्रन्यासकडे मंजुरीकरीता सादर केला आहे.

या बाजारांत वर्षभरांत ५०८५५१ मॅट्रीक टन कृषि मालाची आवक होते व सरासरी ३१३५ कोटी रुपयांची उलाढाल होते. त्यावर बाजार समितीला बाजार फी चे रुपाने ३१.३५ कोटी रुपये उत्पन्न मिळते. बाजार समितीने स्वत:च्या निधीतून बाजार आवाराची उभारणी करुन विकास कार्याची कामे पुर्ण केलेली आहेत. बाजार समितीवर आजमितीस कोणाचेही कर्ज नाही तसेच शासनाकडुन अनुदान मिळालेले नाही. तसेच नविन धान्य बाजार मध्ये १८६ दुकानाचे बांधकाम करण्यांत आल्यामुळे फक्त १८६ दुकानांचे मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार वाटप करण्यांत आले. सद्या १०३ दुकानांचे बांधकाम व कॅन्वासिंग एजन्ट ब्लॉक १५८ बांधकाम झाले असून ते सुध्दा उर्वरीत ईतवारी व कॅन्वॉसिंग एजन्ट येथील व्यवसायीकांना वाटप करावयाची आहे. तसेच खसरा क्र ११२ वरती १४ एकर जागेमध्ये प्रस्तावित १४४ दुकाने/गोदाम भाजी बाजाराचे बांधकाम झाले आहे. तेथे लवकरच भाजी बाजार पुर्णपणे सुरू करावयाचा आहे. बाजार आवारातील सर्व सुविधा आणि सेवा समितीच्या स्वत:च्या उत्पन्नातुन समितीने निर्माण केलेले आहेत.

बाजार आवारावर १० चाकी/१६ चाकी ट्रक तसेच ट्रेलर शेतमालाचे आवागमन होत असल्याने समितीने ६० मे.टन तीन व ३० मे.टन वजनाचे संगणीकृत धर्मकाटे समितीमध्ये सुरू आहे. धान्य बाजार, न्यु ग्रेन मार्केट ,संत्रा व फळे बाजार, मिरची बाजार व आलु—कांदा बाजारातील रोडचे डांबरीकरण व सिमेंट कॉक्रीटीकरण चे काम पुर्ण करण्यात आले आहे. लिलाव दालनामध्ये शेतक—यांना थंडपाणी पिण्याकरीता वॉटर कुलरची व्यवस्था केलेली आहे.

बांधकाम व जमिनी विषयी माहिती उपक्रम

बाजार समितीचे पं.जवाहरलाल नेहरू बाजार आवार मौजा चिखली देवस्थान येथील समितीकडे १४४ एकर जागा असून बाजार आवार विकास विस्ताराकरीता लगतची ख.क्र.९४ मधील ९.५६ एकर व ख.क्र. ११४/१ मधील १.७२ एकर व खसरा क्र.११४/२—३ख मधील १.६२ एकर जागा संपादन करण्याची कार्यवाही सुरू आहे.

समितीचे उपबाजार बुटीबोरी येथिल खसरा क्र.१२८ येथे भाजी/गोडावून लिलाव दालन उभारण्याचे रू. १८६४३०११/— चे कामास मंजुरी प्राप्त झालेली असुन रू.१५२१४८२५/— चे कामाचे दि. १५/०५/२०२५ ला कार्यारंभ आदेश देण्यात आलेला आहे.

समितीचे पं.ज.नेहरू मार्केट यार्ड मधील जुन्या AC शिट्स बदलिवणे व किरकोळ दुरूस्तीचे रू. १०२७.३२ लक्षचे कामाचे प्रगतीत आहे. त्याचप्रमाणे नविन भाजी बाजार जुना भाजी बाजार, काटा क्र.४ गुरे बाजार, मिरची बाजार न्यु. ग्रेन मार्केट व जुने न्यु ग्रेन मार्केट येथिल रू.७७३९.६३ लक्ष चे डाबंरीकरण क्रांक्रीट रोड, पेव्हमेट व नालीचे कामे प्रगतीत आहे.

समितीचे पं.ज.नेहरू मार्केट यार्ड मधील चिखली गेट ते आवक गेट क्र. २ न्यु ग्रेन मार्केट जावक गेट ते काटा क्र.४ व प्रशासकिय भवन ते मिरची शॉप कम गोडावून क्र.३ या रस्त्यावर रोडच्या दुभाजक मधील एम. एस. ग्रिल दुरूस्तीचे रू.१४८.६० लक्षाची कामे प्रगतीत आहे.

समितीचे पं. ज. नेहरू मार्केट यार्ड मधील न्यु ग्रेन मार्केट, आलु, कांदा, भाजी,जुने धान्य संत्रा व फळे, मिरची बाजार येथिल बाजार निहाय दुरूस्तीचे रू.२९३.०३ लक्षाचे कामे प्रगतीत आहे.

समितीचे पं.ज.नेहरू मार्केट यार्ड मधील सिव्हर, स्टॉम वॉटर व सांडपाणी प्रक्रिया केद्राचे रू. १९८५.९५ लक्षाचे काम प्रगतीत आहे.

समितीचे पं.ज.नेहरू मार्केट यार्ड मधील १४४ गाळे वाटप करण्यात आलेले असुन बाहय व अंतर्गत विद्युतीकरणाचे रू.१५०.०० लक्षाचे काम प्रगतीत आहे.

समितीचे पं.ज.नेहरू मार्केट यार्ड, शेतकरी, हमाल व अडते यांचे सुविधेकरीता ४ थंड पाण्याचे आर.ओ.प्लॉन्ट वाटर एटीएम सुरू असुन नविन धान्य बाजार येथिल आर.ओ.प्लॉन्ट व वाटर एटीएम चे काम प्रगतीत आहे.

खसरा क्र.९४ मौजा चिखली (देव) ता.जि.नागपूर येथिल ९.५६ एकर जागा समितीने संपादीत केली असुन उपरोक्त जागेचा ताबा समितीला दि. ८.४.२०२५ रोजी मिळालेला आहे. तसेच खसरा क्र. ११४/२—३ ख मौ.जा. चिखली (देव) ता. जि. नागपूर येथिल १.६२ हे. आर (चार एकर) जागा मा. उच्च न्यायालयाचे आदेशाप्रमाणे संपादीत करणेसाठीची प्रकिया मा. उपजिल्हाधिकारी भूसंपादन (सामान्य) नागपूर यांचे मार्फत सुरू आहे.

विद्युत व पाणी विभाग विषयी माहिती उपक्रम

समितीचे पं. जवाहरलाल नेहरू मार्केट यार्डवरील विद्युत व्यवस्थेचे दृष्टीने ग्रीड केबल नेटवर्क नुतनीकरणाचे काम झालेले आहे. अस्तित्वात असलेले सर्व पथदिवे/फ्लडलाईट्सने बदलविणे इमारती व ऑक्शन हॉल मधील जुने विद्युत पॅनल काढून नविन एम.सी.सी.बी.पॅनल लावणे व संपुर्ण बाजार आवारात ९५० के.व्ही क्षमतेचा सोलर प्रकल्प प्रस्तावित आहे.

गादा ते.पं.जवाहरलाल नेहरू मार्केट यार्ड, कळमना पर्यत २५० एम.एम.व्यासची १५ किमी. नविन डी.आय. पाईप टाकण्यात आली आहे.

बाजार आवारातील सोयी सुविधा व सेवा

बाजार आवारात समितीने २५ लिलाव दालने, ८०९ दुकाने व गोदामे, ४९२ अडते/व्यापा—याची कार्यालय, १८९ किरकोळ विक्रीची दुकाने, १००० मेट्रीक टन व ३३०० मेट्रीक टन क्षमतेची दोन गोदाम, १९ लक्ष लीटर क्षमतेची पाण्याची टाकी आणि जलशुध्दीकरण व पाणी पूरवठा योजना, दुधाळ जनावरांसाठी शेड, प्रसाधन गृहे. शेतकरी निवासामध्ये २०० शेतक—यांना राहण्याची सोय इत्यादी सुविधा उपलब्ध करुन दिलेली आहे.

बाजार समिती चालवित असलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रम व स्वरूप

नागपूर कृषि उत्पन्न बाजार समितीने शेतकरी निवासमध्ये शेतक—यांनकरीता रू.५/—मध्ये पोटभर जेवण देण्यांत येत आहे. तसेच आवारावर रूग्णाकरीता ॲम्बुलन्स (रूग्णवाहीका)ची व्यवस्था केलेली आहे. तसेच अपोलो टायर फाउंडेशन यांचे सौजन्याने आरोग्य सेवा केंद्र सुरू केलेले आहे.

बॅंका :—

बाजार आवारावर ६ बॅकेच्या शाखा उघडण्यांत आलेल्या आहेत. पंजाब नॅशनल बॅक, नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅक, नागपूर नागरीक सहकारी बॅक, सारस्वत बॅक, जनता सेवा सहकारी बॅक, वर्धमान अर्बन को.ऑप. बॅक, कार्यरत आहेत.

विद्युत व्यवस्था :—

बाजार आवारावर समितीने १२५० के.व्ही.ए क्षमतेचे इलेक्ट्रीक सब—स्टेशन स्थापीत केले आहे. तसेच विज पूरवठा खंडीत होवू नये म्हणून एक्सप्रेस फिडरची व्यवस्था केलेली आहे.

बाजार आवारात पोलीस स्टेशन, पोस्ट ऑफीस व वरील दोन बॅकेने ए.टी.एम मशीनची व्यवस्था समितीने स्वत: बांधलेल्या इमारतीत केलेली आहे.

संगणकीकरण :—

समितीचे संगणकीकरण सन २००० पासून सुरू झाले आणि सन २००३ पर्यत ३ टप्यात समितीचे अप्लीकेशन सॉफटवेअर तयार केलेले असुन समितीच्या प्रशासकीय भवनाशी वायरलेस व ऑप्टीक फायबर केबल व्दारे सर्व उपकार्यालये, आवक—जावक गेट व चिखली गेट तसेच सर्व वे— ब्रिज जोडण्यात आले आहे.

समितीच्या संगणकीकरणामध्ये प्रामुख्याने सर्व बाजाराची सेस वसूली, गुरे बाजार सेस वसुली, विद्युत बिल, पाणी बिल वसुली, गाळे विभाग, लायसंस विभाग, फायनान्स विभाग, डेड स्टॉक, कोर्ट केसेस, कर्मचा—यांचे पगार पत्रक, टायपिंग चे सर्व काम संगणकीकृत झालेले आहेत. तसेच मालाची आवक—जावक नोंद संगणकावरच केली जाते. समितीचे आवारातील सर्व संगणकीकृत डाटा समितीचे मुख्य कार्यालय येथील मुख्य सर्वरमध्ये साठविण्यांत येतो.

बाजार समितीने नविन तंत्रज्ञानावर आधारित अद्ययावत मराठी व इंग्रजी भाषेतील वेबसाईट www.apmcnagpur.in तयार केली आहे. हयामध्ये बाजार समितीचे संपूर्ण माहिती आणि दररोजचे बाजारभाव उपलब्ध आहेत. तसेच दररोजचे बाजारभाव www.msamb.com व्दारे कृषि पणन मंडळ येथे पाठविण्यांत येतात व संपूर्ण राज्याचे बाजारभाव पाहण्याची सोय उपलब्ध आहे. व समितीचे धान्य बाजार आवारात केन्द्र शासनाची ENAM (ईनाम) योजना राबविण्यात येत आहे.

बाजार समितीचे प्रशासकीय भवन, सर्व उपकार्यालय, गेट व काटयावर सिसिटीव्ही कॅमेरे बसविण्यांत आलेले आहेत. सर्व कॅमेऱ्यांचा सेटअप समितीचे मुख्य कार्यालया/जावक गेटवर कंट्रोलींग करीता उपलब्ध आहे. त्यामुळे बऱ्याच प्रमाणात समितीचे उत्पन्न वाढण्यास मदत झालेली असुन त्यामुळे बाजार आवाराचे नियंत्रण करणे सोयीचे झाले आहे.

माती परिक्षण प्रयोगशाळा

१. गांडुळखत प्रकल्प :—

महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ पुणे यांचे दि. ०९/०२/२०१८ रोजी पत्राचे अनुषंगाने ई—कृषि उत्पन्न बाजार समिती आवारात गांडुळखत प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. समितीचे बाजार आवारात गांडुळ खत निर्मितीसाठी २ शेड तयार केलेले आहेत. प्रति शेड प्रति वर्ष १० टन प्रमाणे एकुण २० टन गांडुळखत तयार करून शेतकऱ्यांना माफक दरामध्ये उपलब्ध करून देण्यात येते.

शेतकऱ्यांना उत्तम प्रतिचे गांडुळखत ना—नफा ना तोटा तत्वावर उपलब्ध करून दिल्या जाते.

२. गुणवत्ता तपासणी प्रयोगशाळा :—

ई—नाम योजने अंतर्गत धान्य बाजारातील गहु, हरभरा,तुर, सोयाबिन, धान या पिकांचे नमुने घेऊन भौतिक गुणधर्म तपासणी केल्या जाते. ज्यामधे रंग, चकाकी, आद्रतेचे प्रमाण, किड लागलेले धान्य इत्यादी तपासून धान्याचा श्रेणी अ,ब,क, ठरवल्या जातात सदर माहिती केंद्र शासनाच्या ई—नाम पोर्टलवर नियीमत सादर करण्यात येते.

पिण्याच्या पाण्याची स्वतंत्र व्यवस्था

बाजार आवारावर महानगरपालिके कडून आवश्यक तेवढया पाण्याचा पुरवठा होत नसल्यामुळे शासनाच्या भूजल सर्वेक्षण विभागाकडून पाहणी केली असता खाली पाणी नाही असा अहवाल मिळाला. व म्हणून पाण्याची आजची आवश्यकता व भविष्यातील पाण्याची आवश्यकता पुर्ण होण्याकरीता स्वतंत्र पाणीपुरवठा असणे आवश्यक आहे असे समितीला वाटले. त्यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडे पाहणी करण्याचे काम सोपविले.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी बाजार समितीचे आवारापासून १७ कि.मी. अंतरावर असलेल्या कन्हान नदीच्या पात्रावर गादा येथे जागेची निवडं केली. त्यांनीच या कामाचे अंदाजपत्रक तयार करुन त्यांच्याच देखरेखी खाली काम पूर्ण करण्यांत आले आहे. त्याकरीता ६.५० कोटी रुपयाचा खर्च समितीने स्वनिधीतुन केलेला आहे. कन्हान नदीवरुन बाजार समितीपर्यंत पाणी आणण्यांत आले असून पाणी शुध्दीकरणासाठी इमारत सुसज्ज करण्यांत आलेली आहे. त्यामुळे बाजार आवारावरील पाण्याची समस्या दुर झालेली आहे. तसेच शेतकऱ्यांकरीता शुध्द पाणी उपलब्ध करून देण्याकरीता समितीने धान्य बाजार ,संत्रा व फळे बाजार, भाजी बाजार, मिरची बाजार व न्युग्रेन मार्केट येथे आर.ओ. वॉटर ए.टी.एम. सुरू केले आहे.

—: शेतमाल तारण योजना :—

शेतक—यांचे मालाला योग्य भाव मिळण्यास शेतमाल साठवणुकीकरीता सदर योजनेअंतर्गत गोदाम उपलब्ध करून देण्यात आलेले असुन शेतमालातारण योजना समिती स्वनिधीतुन राबवित आहे. त्याकरीता बाजार समिती कडून शेतक—यांना ७५ टक्के अग्रीम रक्कम दिला जातो व सन २०२४—२५ मध्ये रू. २७.२० लाख अग्रीम शेतक—यांना दिलेला आहे

—: बाजार समितीचे फि पासुन उत्पन्न :—

समितीचे प्रमुख उत्पन्न बाजार फी चे असून कृषि उत्पादित सर्व शेतमालाचे खरेदीवर खरेदीदारांकडून रुपये १००/— चे खरेदीवर १ रु. बाजार फी कायदेशीर तरतुदीनुसार वसूल करते. तसेच अनुज्ञप्तीधारकाकडून अनुज्ञप्ती फी वसूल करते. मागील ५ वर्षात वसूल झालेली बाजार फी, अनुज्ञप्ती फी, काटा फी तसेच सांक्षांकन फी संबंधिची माहिती पुढील प्रमाणे आहे.

अ. क्र	विवरण	आकडेवारी लक्षामध्ये				
		२०२०—२१	२०२१—२२	२०२२—२३	२०२३—२४	२०२४—२५
१	बाजार फी	२५०८.००	२६२०.३२	२८७३.८९	३१८७.५५	३१३५.०९
२	अनुज्ञप्ती फी	२.३४	२.२७	३.५८	२.३०	१.७४
३	काटा फी	३५.५५	३९.२१	६२.२७	६७.९४	६३.०२
४	सांक्षांकण फी	२.९८	३.४९	२.९१	२.००	१.९४
५	एकूण फी	२५४८.८७	२६६५.२९	२९४२.६५	३२५९.७९	३२०१.७९

अनुज्ञप्ती बाबत माहिती :—

समितीला घोषित शेतमालाच्या नियमनाकरिता खालील अनुज्ञप्ती प्रदान करण्याचे अधिकार असल्याने गेल्या ५ वर्षातील अनुज्ञप्ती धारकांची/व्यवसाईकांची संख्या पुढील प्रमाणे आहे.

अ .क्र	अनुज्ञप्तीच । प्रकार	२०२०—२१	२०२१—२२	२०२२—२३	२०२३—२४	२०२४—२५
१	व्यापारी	१४५९	१६०२	१८९९	१५८९	१५५७
२	अडते	७८५	७८५	९१९	९०६	९०४
३	दलाल	९३	१०५	१०१	८२	७४
४	हमाल	४७८	३०७	३०५	२५२	२३०
५	मापारी	२८	२७	२६	२३	१८
६	मदतनिस	११	११	१३	१२	११
७	प्रक्रिया	५७	६३	५६	६२	७६
	एकण	२९१७	२९०२	३३१९	२९२४	२६८७

या अगोदर समितीची वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक १२.०९.२०२४ रोजी संपन्न झाली. तसेच समितीचे दिनांक १.४.२०२३ ते ३१.३.२०२४ या कालावधीचे संवैद्यानिक लेखापरिक्षण शासनाचे सहकारी विभाग, जिल्हा विशेष लेखापरिक्षक सह. संस्था, नागपूर यांनी केले असुन सदर लेखा परिक्षण अहवाल दि. १७.०९.२०२५ ला प्राप्त झालेला आहे. दोष दुरूस्ती अहवाल तीन महिन्यात पाठवायचा असुन त्याची प्रक्रिया सुरू आहे.

बाजार समितीप्रती महाराष्ट्र शासनाची भूमिका कुशल नेतृत्वाची, सहकार्याची व सहानुभूतीची राहीलेली आहे. त्यात प्रामुख्याने मा.ना. श्री. नितिनजी गडकरी वाहतुक रस्ते दळणवळण मंत्री भारत सरकार तसेच मा.ना.श्री. देवेन्द्रजी फडणवीस मुख्यमंत्री, , महाराष्ट्र राज्य, मा.ना.श्री. एकनाथजी शिंदे उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मा.ना.श्री अजितदादा पवार उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मा.श्री. सुनिल केदार माजी मंत्री/आमदार सावनेर यांचे मार्गदर्शना खाली व नेतृत्वात सदरहु बाजार समितीचे कामकाज चालवण्यास विशेष सहकार्य लाभत असते त्यामुळे त्यांचे जेवढे आभार मानावे तेवढे कमीच आहे. नागपूर जिल्हयातील आजी माजी खासदार व आमदार, स्थानीक संस्थेचे पदाधिकारी हयाशिवाय मा.श्री. विकास रसाळ पणन संचालक, महा.राज्य पुणे, विभागीय सहनिबंधक श्री. प्रवीण वानखेडे, जिल्हा उपनिबंधक श्री. अजय कडु, श्री संजय एन.कदम, सरव्यवस्थापक व श्री.राजेश द.सरोदे, उपसरव्यवस्थापक, महा.राज्य. कृषि पणन मंडळ यांचे वेळोवेळी कुशल नेतृत्वाखाली अमुल्य सहकार्य लाभले त्यांचादेखिल मी आभारी आहे. हयाशिवाय मा. विजयालक्ष्मी प्रसन्ना बिदारी, विभागीय आयुक्त नागपूर, मा. श्री. विपीन ईटनकर, जिल्हाधिकारी नागपूर, यांचेदेखील मोलाचे सहकार्य लाभले त्यांचा देखिल मी आभारी आहे.

याठिकाणी आर्वजून उल्लेख करावा वाटतो की, या बाजार समितीचे संस्थापक व माजी सभापती सहकार महर्षी स्व.श्री. बाबासाहेब केदार हयांचे प्रेरणेतून हया बाजाराची उभारणी झालेली आहे. तसेच समितीचे माजी सभापती स्व.श्री.व्दारकाप्रसादजी कांकाणी यांनी समितीस दिलेल्या योगदानाबद्यल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे. हयाशिवाय नागपूर सुधार प्रन्यासचे सभापती व त्यांचे अधिकारी वर्ग, नागपूर महानगर पालीकेचे प्रशासक व त्यांचे अधिकारी वर्ग, महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अभियंता व त्यांचे अधिकारी हयांनी बाजार समितीच्या अडी अडचणी समजून घेवून समितीला जी मदत केली त्यांचे भरीव सहकार्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. बाजार समितीचे अत्याधुनिक अशा बाजार आवारास दरवर्षी सरकारी, निमसरकारी, केन्द्रीय शासनाचे अधिकारी तसेच राज्यातील व राज्याबाहेरील कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती व संचालक दरवर्षी भेट देत असतात.

हया बाजार समितीचे निर्मितीकरीता व बाजार भरविण्याकरीता नागपूर जिल्हयातील शेतकरी बांधवांनी तसेच नागपूर शहरातील सर्व प्रकारच्या व्यवसायीकांनी जी भरीव मदत केली त्यांचे मदतीशिवाय बाजार स्थानांतरणाची कार्यवाही करणे शक्य झाले नसते अश्या सर्वांचे त्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

भारताचे पहिले पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरु यांचे स्मृती देशवासीयांच्या मनात नेहमीकरीता कायम राहाव्यात म्हणून बाजार समितीने विकसीत केलेल्या हया बाजार आवाराचे पं. जवाहरलाल नेहरु मार्केट यार्ड, नागपूर असे नामकरण सन १९९५ मध्ये केलेले आहे.

आज पं. जवाहरलाल नेहरु मार्केट यार्ड हा बाजार राज्यातच नव्हे तर संपूर्ण देशामध्ये एक प्रमुख नियंत्रीत बाजारपेठ म्हणून नावलौकीकांस आलेली आहे. देशाचे मध्यभागी वसलेल्या नागपूर शहराचे सौंदर्यात त्यामुळे भर पडलेली आहे. दळण वळणाची साधणे, कम्युनिकेशनची व्यवस्था, वाहतुकीकरीता राष्ट्रीय महामार्ग त्यामुळे हया बाजार आवारात येणारी आवक ही नागपूर जिल्हयातुनच नव्हे तर महाराष्ट्र राज्यातील इतर जिल्हयातुन तसेच राज्याबाहेरुन फार मोठया प्रमाणात बाजार आवारावर होत असते. त्यात प्रामुख्याने आंबा, डाळींब, सफरचंद, द्राक्षे, कांदा—बटाटा, मिरची इत्यादी शेतमालाचा उल्लेख करता येईल तसेच शेतमालाचे विक्रीनंतर येथून परराज्यात व देशाबाहेर माल पाठविला जातो. नागपूर शहरांत कार्गो हब निर्माण होवू घातलेले आहे. व कृषि उत्पादित शेतमालाच्या निर्यातीची व्यवस्था करण्यांत येत आहे त्यामुळे बाजार समितीचे क्षेत्र व त्यामध्ये भरत असलेले बाजार हयास महत्व प्राप्त होणार आहे.

नागपूर तालुक्यातील ग्रामपंचायती, सेवा सहकारी संस्था चे पदाधिकारी व सदस्य, अडते/व्यापारी व हमाल वर्गाचे तसेच कृषि उत्पन्न बाजार समितीचे सर्व संचालक मंडळ तसेच समितीचे सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या सहकार्यामुळे हे घडू शकले त्या सर्वाचे आभर मानतो.

आपण करित असलेल्या सहकार्याबद्दल मी आपणा सर्वाचे आभार माणून हा अहवाल संपवितो.

संचालक मंडळाच्या वतीने

दिनेश चंदेल	प्रकाश राधाकिसनजी नागपूरे	अहमदभाई करीमभाई शेख
सचिव	उपसभापती	सभापती,

व सर्व संचालक मंडळ,

<u>विषय क्र.३</u>: सन २०२४–२५ च्या आय–व्यय आणि ताळेबंद पत्रकाची माहिती देणे.

कार्यालय, नागपूर कृषि उत्पन्न बाजार समिती, नागपूर

पं. जवाहरलाल नेहरू मार्केट यार्ड, नागपूर - ३५

दिनांक १/४/२०२४ ते ३१/३/२०२५ कालावधी आय-व्यय विवरण पत्रक

अ.क्र.	व्ययाचे विवरण	रक्कम रूपये	अ.क्र.	आयचे विवरण	रक्कम रूपये
१	सभापती/उपसभापती मानधन	१८५०००.००	१	बाजार फी	३१३५०९३९३.०७
२	सभासद प्रवास भत्ता	१०२३५.००	२	अनुज्ञप्ती फी	१७४२२७.००
३	सभासद दैनिक भत्ता	७३२००.००	३	अनुज्ञप्ती विलंब शुल्क	४४५३१६.२००
४	सभासद उपस्थिती भत्ता	४५७५०.००	४	अनुज्ञप्ती दुय्यम प्रंत फी	२६७८.००
५	सभा खर्च	४३९२७.००	५	गुरे साक्षांकण फी	१९३८३४.००
६	अधिकारी/कर्मचारी वेतन	२८०९५४५५.००	६	गुरे गेटपास फी	६४६०८२.००
७	अधिकारी/कर्मचारी महागाई भत्ता	१४६४२०२६.००	७	किरकोळ दंड	३८३४६३.००
८	अधिकारी/कर्मचारी प्रवास भत्ता	२०६२८.००	८	वॉटर ऐ.टी.एम.	२३९४४९.००
९	अधिकारी/कर्मचारी दैनिक भत्ता	७६२५.००	९	छापिल साहित्य विक्री	२६१६६५.००
१०	अधिकारी/कर्मचारी घरभाडे भत्ता	५३२०८८२.००	१०	काटा फी	६३०२८४०.००
११	अधिकारी/कर्मचारी विशेष भत्ता	८२५.००	११	गांडुळ खत विक्री	२४०२०.००
१२	अधिकारी/कर्मचारी पोशाख व धुलाई	५०५०:००	१२	विद्युत बिल वसुली	२०२३३०५३.००
१३	अधिकारी/कर्मचारी प्रतिनियुक्ती भत्ता	२९४६७.००	१३	कॅन्टीन पानठेले ऑक्शन चार्जेस	१०१८०९९.००
१४	अधिकारी/कर्मचारी भ.नि.निधी खर्च	६०५४३५१.००	१४	आयकर परतावा	६०६७६५.००
१५	अधिकारी/कर्मचारी उपदान ख़र्च	५००००००.००	१५	गुंतवणूकीवरील व्याज	१३१६७४४७९.००
१६	अधिकारी/कर्मचारी अर्जीत रजा वेतन	९३८२५००.००	१६	गोदाम भाडे	२६३४८२८.००
१७	अधिकारी/कर्मचारी सानुग्रह अनुदान	३२५७६५४.००	१७	बाजार ऑफीस भाडे	४६१००.००
१८	अस्थायी कर्मचारी वेतन	१४७६२१७२.००	१८	पाणी बिल वसुली	६७३१३९.००
१९	अधिकारी/कर्मचारी वाहन भत्ता	१५४७३८६.००	१९	गाळे तबदील फी	१३८११२४१.००
२०	अधिकारी/कर्मचारी वैद्यकिय भत्ता	४०८२८९.००	२०	बाजार आवार भाडे	१२५६००.००
२१	अधिकारी/कर्मचारी शहरी पुरक भत्ता	१४६१२४.००	२१	सेव्हिंग अधिकोष व्याज	१५०५१८०.००
२२	कर्मचारी राज्य विमा निगम	२१२४.००	२२	शेतकरी निवास भाडे	२६१०५०.००
२३	अधिकारी/कर्मचारी पोशाख खरेदी	९९६०.००	२३		
२४	निवडणुक खर्च	१०००००.००	२४		
२५	कार्यालयीन लेखन साहित्य खर्च	२८३७८०.९४	२५		
२६	ऑफीस छपाई खर्च	१८४१०८२.१६	२६		
२७	डाक व तार	१०२००.००	२७		
२८	दुरध्वनी व तार	२८६२२९.४७	२८		
२९	विद्युत बिल व खर्च	३९६२३३३०.००			
३०	महानगरपालिका/ग्रामपंचायत कर	८१७८८४०.००			
३१	आयकर व इतर कर	६४०७१.५४			
३२	वर्तमान पत्रे व नियकालीके	२६४३६.००			
३३	जाहीरात व प्रचार	४०२०१११.००			
३४	भेटी व समारंभ	७७१३२९६.००			
३५	विधीविषक खर्च	३३२८१९२.००			
३६	कन्सलटन्सी चार्जेस	१०७१६५१५.००			

अ.क्र.	व्ययाचे विवरण	रक्कम रूपये	अ.क्र.	आयचे विवरण	रक्कम रूपये
३७	राजस्व मुद्रांक	११००.००			
३८	अंतर्गत/शासकिय अंकेक्षण शुल्क खर्च	९०८२२१.००			
३९	वाहन इंधन	८६४५३२.१९			
४०	वाहन दुरूस्ती	२८६७१३.००			
४१	मालमत्ता विमा	१९४५७५.००			
४२	पाणी बिल खर्च	१५३२८१.००			
४३	प्रशिक्षण खर्च	६८४४.००			
४४	अभ्यास दौरा	४००००.००			
४५	महा. राज्य कृषि पणन मंडळ अंशदान खर्च	२५६९१३७६.००			
४६	महा. राज्य बाजार समिती संघ वर्गणी खर्च	२५०००.००			
४७	अवक्षयण खर्च	५१०५०९४७.६५			
४८	कामगार कल्याण निधी	८३३४.४४			
४९	अविक्रय माल दुरूस्ती	२५०७६३५.००			
५०	बॅक चार्जेस	२२४४३२.२६			
५१	आमसभा खर्च	१७६६५१४.००			
५२	झेरॉक्स खर्च	११८०.००			
५३	इतर खर्च	८१६०४८.७६			
५४	किरकोळ खर्च	९५६२४.००			
५५	वाहन भाडे	५६३१०८.००			
५६	वाहन विमा	३३९०७.००			
५७	मुख्य बाजार देखभाल व संरक्षण	४०२१३२६८.५८			
५८	मुख्य बाजार साफसफाई	१५१४७४२८.००			
५९	मुख्य बाजार सिव्हील कामे देखभाल	११७०४७१०.००			
६०	उपबाजार देखभाल व संरक्षण	३५१९१९८.४२			
६१	उपबाजार साफसफाई	७९०००.००			
६२	उपबाजार सिव्हील कामे देखभाल	८७५०.००			
६३	मुख्य बाजार विद्युत कामे देखभाल	४८६४८९२.००			
६४	वृक्षारोपन व संवर्धन	१६०३७०१.००			
६५	पाणी पुरवठा योजना देखभाल खर्च	१९२५२८८.००			
	आयचे व्ययावरील आधिक्य	१६५२२४१७७.६६			
	एकूण	४९४७७२५०१.०७		एकूण	४९४७७२५०१.०७

मुख्य लेखाधिकारी
कृषि उत्पन्न बाजार समिती
नागपूर

सचिव
कृषि उत्पन्न बाजार समिती
नागपूर

सभापती
कृषि उत्पन्न बाजार समिती
नागपूर

कार्यालय, नागपूर कृषि उत्पन्न बाजार समिती, नागपूर

ताळेबंद पत्रक ३१ मार्च २०२५ रोजी संपणाऱ्या वर्षाचे

ताळेबंद पत्रक (नमुना एन)

रक्कम ३१ मार्च २०२३	देयता	परी क्र.	रक्कम ३१ मार्च २०२४	रक्कम ३१ मार्च २०२३	संपत्ती	परी क्र.	रक्कम ३१ मार्च २०२४
2,92,22,34,607.87	संचीत वाढावा	१	3,08,74,58,785.53		हस्तस्थ रोख आणि अधिकोषस्थ रोख		
				47,00,087.00	हस्तस्थ रोख		1,12,83,644.30
85,67,13,305.90	निधी	२	90,80,79,667.55	9,49,31,155.47	अधिकोषस्थ रोख	५	8,22,07,444.59
3,52,28,272.76	अग्रीम आणि ठेवी	३	4,29,38,941.76	2,06,11,11,488.10	कायम जिंदगी व स्थावर मालमत्ता	६	2,13,45,70,156.10
6,01,67,520.23	शासकीय आणि इतर देणी	४	6,46,83,136.00	1,69,42,86,234.00	गुंतवणूक	७	1,85,68,56,149.00
					चालु (फिरती) मालमत्ता कर्ज व अग्रिम		
				26,25,358.59	I) संवरण स्कंध	८	34,41,334.49
				1,66,89,383.60	II) कर्ज व अग्रिम	९	1,48,01,802.36
3,87,43,43,706.76	एकूण		4,10,31,60,530.84	3,87,43,43,706.76	एकूण		4,10,31,60,530.84

मुख्य लेखाधिकारी
कृषि उत्पन्न बाजार समिती
नागपूर

सचिव
कृषि उत्पन्न बाजार समिती
नागपूर

सभापती
कृषि उत्पन्न बाजार समिती
नागपूर

विषय क्र.४ :— सन २०२५—२६ चे आर्थिक अंदाजपत्रक माहितीस्तव सादर.

कार्यालय, नागपूर कृषि उत्पन्न बाजार समिती, नागपूर

सन 2025-2026 चा मूळ अर्थ संकल्प

बाजार समितीचा वर्ग अ

अ. क्र.	मुख्य	जमा		अ. क्र.	मुख्य	खर्च		एकुण उत्पन्नाशी खर्चाची टक्केवारी (%)
		एकुण उत्पन्न रु.	एकुण उत्पन्नाची टक्केवारी (%)			एकुण खर्च	एकुण खर्चाची टक्केवारी (%)	
अ	अ फी (शुल्क)	319281674	71.49%	ख	ख सभा व भत्ता	346000	0.04%	0.08%
ब	ब इतर उत्पन्न	28102000	6.29%	ग	ग आस्थापना खर्च	104090600	12.13%	23.31%
क	क गुंतवणूक उत्पन्न / भांडवली उत्पन्न	99207000	22.21%	घ	घ प्रशासकीय खर्च	158222000	18.44%	35.43%
ड	ड अनुदान			च	च मुख्य दुय्यम बाजार आवार	82280000	9.59%	18.42%
इ	इ कर्ज			छ	छ व्याज			
	अ+ब+क	446590674	100.00%	ज	ज कर्ज परतफेड (व्याज सोडून)			
	एकुण रु.	446590674	100.00%	त	त भांडवली खर्च	513210000	59.80%	114.92%
	सुरवातीची रोख शिल्लक				ख+ग+घ+च+छ	344938600	40.20%	77.24%
	सुरवातीची बँक शिल्लक	222742477			एकुण रु.	858148600	100.00%	192.16%
	एकुण रु.	222742477			अखेरची रोख शिल्लक			
	एकुण बेरीज रु.	669333151			अखेरची बँक शिल्लक	-188815449		
					एकुण रु.	-188815449		
					एकुण बेरीज रु.	669333151		

आस्थापना	अनुदान	एकुन आस्थापना
98090600	6000000	104090600
21.96%	1.34%	23.31%

मुख्य लेखाधिकारी	सचिव	सभापती
कृषि उत्पन्न बाजार समिती	कृषि उत्पन्न बाजार समिती	कृषि उत्पन्न बाजार समिती
नागपूर	नागपूर	नागपूर

विषय क्र.५ :– सन २०२३–२४ मा. जिल्हा विशेष लेखा परिक्षक, सहकारी संस्था, नागपूर यांनी सादर केलेला लेखापरिक्षण दाखला माहितीस्तव सादर.

लेखापरिक्षण दाखला
(महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी विक्री (नियमन) अधिनियम १९६३ अन्वये)

मी कृषी उत्पन्न बाजार समिती, नागपूर, ता. जि. नागपूर या समितीचे सोबत जोडलेले दिनांक ०१/०४/२०२३ ते दिनांक ३१/०३/२०२४ या कालावधीचे जमा–खर्च पत्रक, उत्पन्न खर्च पत्रक व ताळेबंद तपासले असुन लेखापरिक्षण अहवाल भाग अ, ब आणि क मधील शेऱ्यास अनुसरून अहवाल सादर करतो की,

१. माझ्या लेखापरिक्षणाच्या उद्देशासाठी माझ्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे/माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे खालील प्रमाणे जरूर ती सर्व माहिती व खुलासे मला उपलब्ध झाले आहेत.

२. माझ्या मते व मला मिळालेल्या माहिती व खुलाशांचे आधारे,

अ. ताळेबंद, उत्पन्न खर्च पत्रक समितीने ठेवलेल्या हिशोबी पुस्तकाशी जुळत असुन ३१ मार्च २०२४ या दिनांकाचा ताळेबंद समितीच्या व्यवहाराची, कामकाजाची सत्य व वास्तव स्थिती दर्शवितो आणि उत्पन्न–खर्च पत्रकाचे बाबतीत त्या दिनांकास संपाणाऱ्या वर्षातील वाढवा व उत्पन्नाची सत्य व वास्तव स्थिती दर्शवितो.

ब. समितीचे हिशोब हे त्यावरील टिपणीस पात्र राहुन महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी–विक्री (नियमन) अधिनियम १९६३ कायद्यानुसार आवश्यक ती माहिती देणारे आहेत व समितीच्या आर्थिक व्यवहाराची सत्य व वास्तव स्थिती दर्शवितात.

३. माझ्या मते समितीने महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी विक्री (नियमन) अधिनियम १९६३ व समिती उपविधी यानुसार आवश्यक असणारी हिशोबी पुस्तके योग्य रितीने ठेवलेली आहेत.

स्थळ : नागपूर
दिनांक : २७/०६/२०२५

श्री. एस. एस. आतराम
विशेष लेखापरिक्षक वर्ग–२
सह. संस्था (लेखापरिक्षण),
नागपूर